# इतर पध्दतीने झालेल्या विवाहाची नोंदणी करण्याबाबतची प्रक्रीया

अ. इतर पध्दतीने झालेल्या विवाहाची नोंदणी करण्यासाठी पक्षकारांकडून करावयाची कार्यपध्दत खालीलप्रमाणे आहे.

1. विशेष विवाह नोंदणी नियम,1964 चे अनुसूची अ प्रमाणे विहीत केलेल्या अर्जावर पती-पत्नी यांनी स्वाक्षरी करणे.
2. असा अर्ज ज्या विवाह अधिका-याचे कार्यक्षेत्रात पती-पत्नी किमान सलग 30 दिवस राहत असतील,अशा विवाह अधिकारी यांचे कार्यालयात दाखल करणे
3. अर्ज फी रुपये 100/- विवाह अधिकारी यांचेकडे जमा करणे
4. राहण्याचा, वयाचा व लग्न झाल्याचा पूरावा म्हणून संबधीत कागदपत्रे अर्जासोबत जोडणे
5. विवाह नोंदणीचे दिवशी पती-पत्नी यांनी त्यांना ओळखत असलेल्या 3 साक्षीदारांना सोबत आणणे. सोबत त्यांचे स्वतःचे ओळखपत्रांच्या प्रती दाखल करणे
6. विवाह नोंदणीचे दिवशी विवाह प्रमाणपत्रावर पती-पत्नी व 3 साक्षीदारांनी विवाह अधिकारी यांचेसमोर सहया करणे.

ब. इतर पध्दतीने झालेल्या विवाहाची नोंदणी करण्यासाठी विवाह अधिकारी कडून करावयाची कार्यपध्दत खालीलप्रमाणे आहे.

1.अर्जसोबतची कागदपंत्राची पडताळणी करून अर्ज दाखल करून घेणे

2.रुपये 100/- अर्ज फी जमा करुन घेणे

3.अर्ज प्राप्त झाल्यापासून 30 दिवस असा अर्ज सर्वाच्या पाहणीकरीता हरकत नोंदविणे साठी कार्यालयाचे दर्शनी भागात प्रसिध्द करणे

4.हरकत नसल्यास, 30 दिवसानंतरील नियोजित दिवशी विवाह नोंदणी करणे

5.हरकत आल्यास, चौकशी करून, कलम 15 ची पूर्तता होत असल्याची खात्री झाल्यास विवाह नोंदणी करणे

6.विवाह प्रमाणपत्रावर पती-पत्नी व 3 साक्षीदारांच्या सहया घेणे व प्रमाणपत्र पक्षकारांना देणे